# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६३ वे अंक ८६) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार, दि.२२ मार्च २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


## केंद्र सरकारला निवडणूक आयोगाकडून व्हॉट्सॲपवर 'विकसित भारत' मेसेज पाठवणे तत्काळ थांबवण्याचे निर्देश

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- भारतीय निवडणूक आयोगाने केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला व्हॉट्सॲपवर 'विकसित भारत' मेसेज पाठवणे ''तत्काळ थांबवण्याचे'' निर्देश दिले आहेत. निवडणूक आयोगाने मंत्रालयाकडून या प्रकरणाचा अनुपालन अहवालही मागवला आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीची घोषणा होऊनही आणि आदर्श आचारसंहिता लागू होऊनही केंद्र सरकारच्या उपक्रमांवर प्रकाश टाकणारे संदेश नागरिकांच्या फोनवर वितरित केले जात असल्याच्या अनेक तक्रारी मिळाल्या असल्याचे आयोगाने म्हटले आहे. निवडणूक आयोगाचे निर्देश येताच केंद्र सरकारनेही त्वरीत उत्तर कळवलं आहे.आचारसंहिता लागू होण्यापूर्वी हे संदेश पाठवण्यात आले आहेत. यंत्रणा आणि नेटवर्कमुळे विलंबाने मेसेज पोहोचले जात आहेत, असं सरकारने म्हटलं आहे. आगामी लोकसभा निवडणूकीसाठी निवडणूक आयोगाने हे पाऊल उचलले आहे. निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर आचारसंहिता लागू झाली होती. १६ मार्च रोजी निवडणूक आयोगाने निवडणूक जाहीर केली. त्यानुसार, १९ एप्रिलपासून मतदान होणार आहे. तर, ४ जून रोजी निकाल जाहीर होईल.

# अरविंद केजरीवाल यांना ईडीकडून अटक

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी रात्री सक्तवसुली संचलनालयाकडून अटक करण्यात आली. आज संध्याकाळी ईडीचे अधिकारी त्यांच्या घरी पोहोचले तेव्हाच त्यांच्यावर कारवाई होणार असल्याची कुणकुण लागली होती. ईडीच्या अधिकाऱ्यांनी अरविंद केजरीवाल यांच्या घरी काहीवेळ तपास केला. त्यानंतर साधारण दोन तासांनी ईडीच्या अधिकाऱ्यांनी अरविंद केजरीवाल यांना अटक केली. दिल्लीतील मद्य घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. अरविंद केजरीवाल यांना मद्य घोटाळा प्रकरणात नऊवेळा समन्स बजावण्यात आले होते. मात्र, अरविंद केजरीवाल एकदाही ईडीच्या चौकशीला हजर राहिले नव्हते. अखेर गुरुवारी संध्याकाळी ईडीचे अधिकारी त्यांच्या घरी पोहोचले. सुरुवातीला त्यांची चौकशी होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, दोन तासांच्या चौकशीनंतर ईडीने अरविंद केजरीवाल यांना ताब्यात घेतले. ईडीच्या या कारवाईमुळे आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. ईडीच्या कारवाईनंतर आपचे कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले आहेत. कोणत्याही परिस्थितीत अरविंद केजरीवाल हेच दिल्लीचे मुख्यमंत्री राहतील, असे आपकडून सांगण्यात आले.



अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली. हे एक राजकीय षडयंत्र आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हेच राहतील. त्यांना तुरुंगातून सरकार चालवावे लागले तरी हरकत नाही. मात्र, मुख्यमंत्री केजरीवाल हेच राहतील. ईडीकडून अनेक धाडी टाकण्यात आल्या मात्र, त्यातून एक रुपयाही त्यांना मिळाला नाही. आज लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर अटक करण्यात आली. हे एक षडयंत्र आहे. अरविंद केजरीवाल माणूस नाहीत, ते एक विचार आहेत, अशी प्रतिक्रिया आपच्या नेत्या आतिशी मारलेना यांनी व्यक्त केली आहे.

आज दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना कारवाईपासून दिलासा देण्यास नकार दिल्यानंतर लगेचच ईडीचं पथक चौकशीसाठी हजर झालं. यानंतर 'आप'चे नेते सौरभ भारद्वाज यांनी ईडीच्या पथकाला घरात येण्यापासून रोखले.

मात्र दिल्ली पोलिसांनी घराचा ताबा घेतला. तिथे कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला. दरम्यान 'आप'च्या काही नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयातही धाव घेतली आहे. आज रात्रीच या प्रकरणी सुनावणी घेऊन केजरीवाल यांची अटक टाळण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

दरम्यान काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांनी त्यांच्या अटकेनंतर मोदी सरकारवर टीका केली आहे. त्या म्हणाल्या की केजरीवाल यांना अशा पद्धतीने लक्ष करणे चुकीचे असून असंवैधानिक आहे. राजकारणाचा स्तर घसरणे हे प्रधानमंत्री पदाला व सरकारला शोभणारे नाही. विरोधकांना निवडणूक रिंगणात उतरून विरोध करणे त्यांच्यावर टीका करणे ही खरी लोकशाही आहे. सीबीआय, ईडी यासारख्या संस्थावर दबाव टाकून मुख्यमंत्र्यांना जेलमध्ये टाकण्याची तयारी करणार लाजिरवाणं कृत्य भारताच्या इतिहासात पहिल्यांदा घडत आहे. दरम्यान अरविंद केजरीवाल यांच्या अटकेमुळे खळबळ माजली आहे.

# काँग्रेसची बँक खाती गोठवली

### निवडणूक लढवू नये म्हणून सत्ताधाऱ्यांचे कृत्य; खर्गेंचा भाजपवर गंभीर आरोप

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पत्रकार परिषद घेत पक्षाची बँक खाती गोठवण्यात आल्याचं सांगितलं. काँग्रेसला लोकसभा निवडणूक लढवताच येऊ नये, म्हणून सत्ताधाऱ्यांनी हे कृत्य केलं आहे. गुरुवारी (२१ मार्च) काँग्रेस मुख्यालयात पत्रकार परिषदेत बोलताना खर्गे म्हणाले की, आपल्याला लोकशाही वाचवायची असून सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. देशातील संसाधनं, प्रसारमाध्यमं आणि घटनात्मक आणि न्यायिक संस्थांवर सरकारचं नियंत्रण असल्याचा आरोपही यावेळी त्यांनी केला.

मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. भारत आपल्या लोकशाही मूल्यांसाठी ओळखला जातो. प्रत्येक नागरिक मतदानासाठी उत्सुक आहे. आतापर्यंत निष्पक्ष निवडणुका झाल्या. आज प्रत्येक राजकीय पक्षाला समान संधी मिळायला हवी. सत्ताधारी भाजप सरकारनं संसाधनं, माध्यमं, घटनात्मक आणि न्यायिक संस्थांवर कब्जा केल्याचा आरोप त्यांनी केला. सर्व पक्षांना समान संधी मिळत नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर इलेक्टोरोल बॉण्ड्सचे जे तपशील समोर आले आहेत, ते अत्यंत हैराण करणारे आणि लज्जास्पद आहेत. याच कारणामुळे देशाच्या प्रतिमेला ठेच पोहोचली आहे. गेल्या ७० वर्षांत निष्पक्ष निवडणुका झाल्या आहेत. सुदृढ लोकशाहीची प्रतिमा निर्माण झाली आहे. पण आज त्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

सध्याच्या सरकारनं हजारो कोटी रुपये आपल्या खात्यात भरले आहेत. दुसरीकडे आमची बँक खाती गोठवण्यात आली आहेत, त्यामुळे आम्हाला पैशांअभावी निवडणूक लढवता आली नाही. सत्ताधाऱ्यांचा हा घातक खेळ आहे. याचे दूरगामी परिणाम होतील. लोकशाही वाचवायची असून सर्वांना समान संधी मिळायला हवी असे त्यांनी स्पष्ट केले.

## राज्यातील काँग्रेसचे सात उमेदवार जाहीर

### कोल्हापुरातून शाहू महाराज, पुण्यातून धंगेकर, सोलापूरतून प्रणिती शिंदे रिंगणात

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंसथा)- आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून महाराष्ट्रामधील पहिली यादी जाहीर करण्यात आली असून सात जागांवरील उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. काँग्रेसने देशपातळीवर आज पहिलीच यादी जाहीर करतांना ५७ उमेदवारांची नावे घोषित केली आहेत.

अपेक्षेप्रमाणे कोल्हापूर लोकसभेला श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांची उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. पुण्यामधून आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. काँग्रेसकडून नंदुरबार अमरावती नांदेड पुणे लातूर सोलापूर आणि कोल्हापूर या जागांवरील उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. नंदुरबारमधून गोवळ पडवी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अमरावतीमधून बळवंत वानखेडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नांदेडमधून वसंतराव बळवंतराव चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तर लातूरमधून शिवाजीराव काळगे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर सोलापूरमधून प्रणिती शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता पुण्यामध्ये रवींद्र धंगेकर विरुद्ध मुरलीधर मोहोळ अशी लढत होणार आहे.

## शाहू महाराजांना विजयी करण्याचा उद्धव ठाकरेंचा निर्धार

कोल्हापूर दि.२१ (प्रतिनिधी)- ''शाहू महाराजांच्या प्रचाराला येणार असं मी त्यांना वचन दिले आहे. शिवसेना छत्रपती शाहू महाराजांना विजयी केल्याशिवाय गप्प बसणार नाही,'' असं ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी कोल्हापुरातील न्यू पॅलेस येथे शाहू महाराज छत्रपती यांची भेट घेतली. यावेळी ते बोलत होते. यावेळी तेजस ठाकरेही उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांनी शाहू महाराजांची गळाभेट घेतली.

उद्धव ठाकरे म्हणाले, ठाकरे कुटुंबिय आणि शाहू महाराज यांचे ऋणानुबंध अतूट आहेत. महाविकास आघाडीकडून शाहू महाराजांचे नाव लोकसभेसाठी जाहीर करण्यात आले आहे. शिवसेना छत्रपती शाहू महाराजांना विजयी केल्याशिवाय गप्प बसणार नाही. विजयी मेळाव्याला देखील मी येणार, असा शब्द शाहू महाराजांना दिलेला आहे. मीही शाहू महाराजांच्याकडे काहीतरी मागितलं आहे. त्यामध्ये इथून पुढच्या काळामध्ये शाहू महाराजांची साथ मिळावी, अशी इच्छा बोलून दाखवली आहे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, शाहू महाराजांना शिवसैनिक ताकदीने विजयी करतील कारण हा आमच्या अस्मितेचा विषय आहे. मी फक्त आत्ताच आलोय. मी शाहू महाराजांचा प्रचार करणार आहे. शिवाय त्यांच्या विजयी सभेला देखील येणार आहे. आमच्या विजयासाठी मी त्यांचे आशीर्वाद घेतले आहेत. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे १९९७ मध्ये इथे आले होते. त्यानंतर मी प्रथमच या ठिकाणी आलो आहे. आम्ही महाराजांना पूर्ण ताकदीने विजयी करणार आहोत.

## टीका करतांना पातळी सोडू नका

### एकनाथ शिंदे यांच्या पदाधिकाऱ्यांना सूचना

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याची सर्वच राजकीय पक्षांत चढाओढ रंगली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी आपल्या प्रचाराला सुरुवात करण्यापूर्वी शिवसेनेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांना व लोकसभा निरीक्षकांना कंबरेखालची टीका करण्यापासून स्वतःला दूर ठेवण्याची सूचना केली आहे. त्यांनी यासंबंधी सर्वांना सरकारने केलेली कामे मुद्देसूदपणे जनतेपुढे मांडण्याचे निर्देश दिलेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना मेळाव्यात पक्षाच्या प्रवक्त्यांना मार्गदर्शन केले. त्यात ते म्हणाले की, एका ठिकाणी केलेल्या आरोप प्रत्यारोपांचे दुसऱ्या ठिकाणी पडसाद उमटतात. त्यामुळे कुणालाही पक्षाच्या भूमिकेविरोधात जाता येणार नाही. आपण मराठा समाजालाही आरक्षणाची भेट दिली आहे. हे आरक्षण कोर्टात टिकणारे आहे. पोलिस भरतीही याच आरक्षणानुसार होत आहे. विशेषतः मराठा समाजाला न्याय देताना सरकारने ओबीसी समुदायावरही कोणता अन्याय केला नाही.

विरोधक सरकारवर खालच्या पातळीवर टीका करत आहेत. पण आपण पातळी सोडायची नाही. कुणालाही शिव्याशाप द्यायचे नाही. केवळ विरोधकांना उघडे पाडा. विरोधकांनी हिंदुत्व सोडल्याचे, बाळासाहेबांचे विचार सोडल्याचे जनतेच्या निदर्शनास आणून द्या. पण कुणावरही बिलो द बेल्ट अर्थात कंबरेखालची टीका करू नका. केवळ त्यांचा खरा चेहरा समोर आणा. सरकारने केलेली कामे मुद्देसूदपणे मतदारांपुढे मांडा, अशा विविध सूचना एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्ष प्रवक्त्यांना दिल्या आहेत.

## भाजपची तिसरी यादी जाहीर

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- भाजपची तिसरी यादी आज (२१ मार्च) आली आहे. यामध्ये तामिळनाडूतील ९ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. यामध्ये तेलंगणाच्या राज्यपाल असलेल्या तमिलिसाई सुंदरराजन यांना चेन्नई दक्षिणमधून तिकीट देण्यात आले आहे.

तामिळनाडूमध्ये लोकसभेच्या एकूण ३९ जागा आहेत, त्यापैकी भाजपने १० जागा पीएमकेला दिल्या आहेत. पक्षाने आतापर्यंत २७६ जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपने २ मार्च रोजी पहिली यादी जाहीर केली होती. यामध्ये १९५ उमेदवारांची घोषणा करण्यात आली. पहिल्या यादीत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची नावे होती.

## वेळ पडल्यास आम्ही महायुतीला झटका दाखवू -बच्चू कडू

अमरावती दि.२१ (प्रतिनिधी)- प्रहार जनशक्ती पार्टीचे आमदार बच्चू कडू यांनी सत्ताधारी महायुतीला लोकसभा निवडणुकीत झटका देण्याचा तसेच वेळप्रसंगी दणका देण्याचा इशारा दिला आहे. आमची त्यांना मदत करण्याची तयारी होती. पण त्यांनाच आम्ही त्यांच्याबरोबर नको असल्याचे दिसून येत आहे. असे असेल तर आम्ही त्यांना आमचा झटका दाखवू, वेळ प्रसंगी दणकाही देऊ, असे ते म्हणालेत.



बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पार्टीने अमरावतीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. या बैठकीत लोकसभा निवडणुकीची रणनीती ठरवली जाणार आहे. या बैठकीपूर्वी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना बच्चू कडू यांनी लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला अस्मान दाखवण्याचा इशारा दिला. आम्हाला राज्यभरातून आमच्या कार्यकर्त्यांचे फोन येत आहेत. महायुतीत आपल्याला कोणत्याही प्रकारची विचारणा होत नाही, आपल्याला केवळ ग्रहित धरले जात आहे. आपण त्याचा बदला घेतला पाहिजे. त्यासाठी निवडणूक लढवली पाहिजे, अशी तक्रार ते करत आहेत. त्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांना मानसन्मान मिळत नसेल तर आम्ही निश्चितपणे वेगळा निर्णय घेऊ, असे बच्चू कडू म्हणाले.

## इलेक्टोरल बाँड प्रकरणी एसबीआयने निवडणूक आयोगाला दिला रोख्यांचा संपूर्ण तपशील

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- इलेक्टोरल बाँड प्रकरणात महत्वाची माहिती समोर आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने २१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत एसबीआयला प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितले होते. त्यानुसार, स्टेट बँक ऑफ इंडियाने गुरुवारी (२१ मार्च) सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले. १८ मार्च रोजी दिलेल्या आदेशानुसार, निवडणूक रोख्यांचा संपूर्ण तपशील निवडणूक आयोगाला देण्यात आल्याचे प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

एसबीआयने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, बँकेचे अध्यक्ष दिनेश कुमार खारा यांनी म्हटले की, १८ मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार त्यांनी बाँड खरेदी केलेल्या व्यक्तीचा तपशील, बाँड क्रमांक आणि रक्कम, बाँड कॅश करणाऱ्या पक्षाचे नाव, किती रुपयांचा बाँड होता, राजकीय पक्षाच्या बँक खात्याचे शेवटचे ४ क्रमांक इत्यादी माहिती निवडणूक आयोगाकडे सोपवली आहे. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक आयोग ही सर्व माहिती आपल्या वेबसाइटवर टाकेल.

एसबीआयने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या आपल्या प्रतिज्ञापत्रात पुढे म्हटले की, राजकीय पक्षांचे संपूर्ण बँक खाते क्रमांक आणि केवायसीशी संबंधित माहिती सार्वजनिक केली जाऊ शकत नाही. यामुळे त्या खात्याच्या सुरक्षिततेवर (सायबर सुरक्षा) परिणाम होऊ शकतो. बँकेच्या अध्यक्षांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, आता त्यांच्याकडे केवायसी तपशील आणि संपूर्ण बँक खाते (पान ४ वर)

## एमपीएससीच्या परीक्षा लांबणीवर

पुणे दि.२१ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यात येत्या २८ एप्रिल रोजी होणारी 'महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४', तसेच १९ मे रोजी होणाऱ्या 'समाज कल्याण अधिकारी गट ब', 'इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट ब' या परीक्षांचा समावेश असून, परीक्षेच्या सुधारित तारखा यथावकाश जाहीर करण्यात येणार आहेत. एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. लोकसभा निवडणुकीमुळे नियोजित विविध परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात येत आहेत.

## ..तर मी शिवसेनेचाही राजीनामा देईन; विजय शिवतारे पुन्हा आक्रमक

पुणे दि.२१ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते विजय शिवतारे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात पुन्हा एकदा दंड थोपटले आहेत. जनतेची अजित पवार यांना मतदान करण्याची इच्छा नाही. त्यामुळे महायुतीत एखाद्या उमेदवाराला एवढा विरोध होत असेल, तर आम्ही या प्रकरणी योग्य निर्णय घेऊ. गरज भासली तर आम्ही शिवसेनेचाही राजीनामा देऊ, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेतील वाक्युद्ध अधिकच पेटण्याची भीती निर्माण झाली आहे.

लोकसभेच्या बारामती मतदार संघात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार व विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांच्यात लढत होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांनी ही लढत प्रतिष्ठेची केली आहे. पण शिवसेनेचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी त्यांच्या नाकीनऊ आणलेत. अजित पवार यांनी बुधवारी शिवतारेंच्या आरेला कारेने प्रत्युत्तर देण्याची भाषा केली. त्यानंतर शिवतारे यांनी गुरुवारी त्यांच्यावर पलटवार करताना जनतेची अजित पवारांना मतदान करण्याची इच्छा नसल्याचे स्पष्ट केले.

## पराभव दिसत असल्यामुळे भाजपची केविलवाणी धडपड; विजय वडेट्टीवार यांचा हल्लाबोल

मुंबई दि.२१ (प्रतिनिधी)- सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे बेकायदेशीर आणि घटनाबाह्य म्हटले आहे, त्याच्या मदतीने सध्याच्या सत्ताधारी पक्षाने हजारो कोटी रुपये आपल्या खात्यात जमा केले आहेत आणि दुसरीकडे प्रमुख विरोधी पक्षाच्या बँक खात्यातील पैसे गोठवले आहे. जेणेकरून पैशांअभावी बरोबरीने निवडणूक लढवता येऊ नये. अशी टीका काँग्रेसच्या वतीने भारतीय जनता पक्षावर करण्यात आली आहे. विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भात भाजपची ही केविलवाणी धडपड असल्याचे म्हटले आहे.

आयकर विभागाने १३ फेब्रुवारी रोजी काँग्रेस पक्षाला १०५ कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्यासाठी नोटीस पाठवली होती. विभागाने काँग्रेसला २१० कोटी रुपयांचा दंड ठोठावला आणि बँक खाती गोठवली.काँग्रेस नेते आणि वकील विवेक तंखा यांनी आयकराच्या कारवाईविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. बुधवारी न्यायालयाने काँग्रेसच्या बँक खात्यांवर आयटी कारवाई थांबवण्याची याचिका फेटाळली आहे. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती यशवंत वर्मा आणि न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौरव यांच्या न्यायपीठाने सांगितले की, प्राप्तिकर अपीलीय न्यायाधिकरणाच्या निर्णयात अडथळा आणण्याचे कारण नाही. यावर विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील भाजपवर निशाणा साधला आहे.

या संदर्भात विजय वडेट्टीवार (पान ४ वर)

## चंद्रहार पाटीलच सांगलीत लढणार, ठाकरे गटाची घोषणा

सांगली दि.२१ (प्रतिनिधी)- अवघ्या पश्चिम महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या सांगलीच्या जागेवर ठाकरे गटाने उमेदवारीची घोषणा केली आहे. चंद्रहार पाटील यांच्या उमेदवारीवर संजय राऊत यांनी शिक्कामोर्तब केलं आहे. संजय राऊत म्हणाले की, डबल इंजिन डबल आता सांगलीमध्ये फेल होणार असून ज्या विराट संख्येने इथं जमला आहात ते पाहून मला क्षणभर वाटलं की कुस्तीची दंगल सुरू आहे. कारण सांगली, कोल्हापूरला एवढी गर्दी कुस्तीलाच होते, पण माननीय उद्धवजी आले ते खास पैलवान चंद्रहारसाठी आले.

## सर्वोच्च न्यायालयाच्या कडक भूमिकेनंतर 'पतंजली'ची बिनशर्त माफी

नवी दिल्ली दि.२१ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने पतंजली आयुर्वेद व पतंजली आयुर्वेदचे व्यवस्थापकीय संचालक आचार्य बाळकृष्ण यांना सर्वोच्च न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी नोटीस पाठवली होती. या नोटिशीनंतर पतंजली आयुर्वेदकडून बिनशर्त माफी मागण्यात आली आहे. मागच्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने २ एप्रिल रोजी आचार्य बाळकृष्ण आणि बाबा रामदेव यांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते. यानंतर पतंजलीकडून आज शपथपत्र दाखल करून बिनशर्त माफी मागण्यात आली.

इंडियन मेडिकल असोसिएशनने पतंजली आयुर्वेद विरोधात एक रिट याचिका दाखल केली होती. पतंजली आयुर्वेदकडून ड्रग्ज अँण्ड ऑदर मॅजिक रेमेडिज अॅक्ट, १९५४ व ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ चे थेट उलंघन केले जात असल्याचा दावा या याचिकेद्वारे करण्यात आला होता. ''अॅलोपॅथीकडून होणारा अपप्रचार : स्वत:ला व देशाला फार्मा (पान ४ वर)

# आचारसंहितेचा बागुलबुवा नको!

**लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला. दि. १६ मार्चला दुपारी ३ वाजल्यापासून भारत देशभरात आचारसंहिता लागू झाली. निवडणुका सुरळीत आणि नियम, कायदे यांचे पालन करत झाल्या पाहिजेत. त्यासाठी आचारसंहिता असायलाच पाहिजे. सर्वच राजकीय पक्षांनी आपल्या उमेदवाराचा प्रचार करताना, प्रचार यंत्रणा राबवताना काय करावे आणि काय करू नये, कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत, याची एक संहिता निवडणूक आयोगाकडून जारी केली आहे. या निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या चौकटीप्रमाणेच उमेदवार आणि त्यांच्या पक्षाने प्रचार यंत्रणा राबवणे अपेक्षित आहे. त्याच तंतोतंत पालन होत असत. कायद्याची चौकट पाळूनच प्रचार यंत्रणा कार्यरत राहते. त्यात कुणाला काही गैर वाटल तर तक्रारही केली जाते. तशा तक्रारीही होतात. या तक्रारींची दखल निवडणूक विभागाकडून घेतली जाते. या सर्व गोष्टी प्रत्यक्ष निवडणुकीशी संबंधित आहेत. त्याबद्धल कोणाचही दुमत नाही.**

**निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्वच बाबतीत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सर्व कामकाज पार पडलच पाहिजे. संबंधित अधिकारीही त्यासाठी सतर्क राहून कार्यरत असतात; परंतु आचारसंहिता जाहीर झाली की त्याचा परिणाम विकास प्रक्रियेवर होऊ देता कामा नये. बऱ्याचवेळा या आचारसंहितेच्या नावाखाली विकासकामेच थांबवली जातात. राज्यातील वातावरणाचा विचार करता मार्च, एप्रिल, मे हे तीन महिने रस्ते, पाटबंधारे आणि बांधकामांसाठी अधिक महत्त्वाचा कालावधी आहे. याच कालावधीत रस्ते बांधकाम पूर्ण केली जातात. सर्वसाधारणपणे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाला सुरुवात होते. अर्थात गेल्या दोन-पाच वर्षांत पाऊस केव्हाही कोसळतो. अशा बदललेल्या वातावरणाचा परिणाम केवळ भाजीपाला, फळपिकांवरच होतो असे नाही, तर त्याचा परिणाम विकास प्रक्रियेवरही होत असतो.**

**काहीवेळा काय घडतं की, आचारसंहिता जाहीर झाली की काही अधिकारी कोणत कामच करत नाहीत. कोणत्याही विकासकामांचा विषय आला की आचारसंहितेचे कारण पुढे केले जाते. ज्या विकासकामांशी आचारसंहितेचा काहीही संबंध नसतो, त्याबाबतीत आचारसंहिता असल्यामुळे काम करता येत नाही, असे सांगणारे कामचुकारही प्रशासनात आहेतच! वास्तविक आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वीच जर सर्व तांत्रिक व प्रशासकीय पातळीवरील कागदपत्रांची पूर्तता केलेली असेल, तर आचारसंहितेच्या नावाखाली विकासकामे थांबवण्याचे कोणतही कारण नाही. आचारसंहिता जाहीर झाल्यावर नवीन प्रस्तावांना मंजुरी, उद्घाटन आदी बाबतीत वेगळ धोरण आहे; परंतु खरोखरीच ज्यांना कामचुकारपणा करायचा आहे, ज्यांच्यामध्ये प्रशासकीय कामकाजातील नकारात्मकता ठासून भरलेली आहे, प्रशासनातील नकारात्मकता जपणारे अधिकारी याच आचारसंहितेविषयी उगाचच अर्थ-अन्वयार्थ शोधून काहीच काम न करण्याच्या मानसिकतेत असतात.**

**आचारसंहितेचे तंतोतंत पालन व्हायलाच पाहिजे आणि त्याचबरोबर आचारसंहितेच्या नावाखाली विकासकामांवरही त्याचा परिणाम होता कामा नये, हे देखील पाहिले पाहिजे; परंतु निवडणुका जाहीर झाल्या की साहजिकच आचारसंहिता आली. आचारसंहिता जारी झाली की, विकासप्रक्रिया थांबली हे घडू नये, अशी अपेक्षा आहे. याच कारण जी काम सध्या सुरू आहेत ती अधिक गतिमान करून लवकरात लवकर पूर्ण कशी होतील, हे पाहिले पाहिजे. याच कारण जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबरपर्यंत म्हणजे पाच महिने बांधकामांशी संबंधित सर्वच काम थांबलेली असतात. यामुळेच तसे नियोजन राज्यात या सर्वांचा विचार करून केलेले असेलच त्याबद्धल प्रश्नच नाही; परंतु यापूर्वीचा पूर्वानुभव हा आचारसंहिता जारी झाली की विकासकामांची केवळ गती मंदावत नाही, तर कोणत्याही विकासकामांच्या बाबतीत तोच दृष्टिकोन ठेऊन पाहिले जाते. अर्थात जसा अधिकाऱ्यांच्या नकारात्मकतेचा दोष आहे त्याचप्रमाणे नागरिक, ग्रामस्थही सकारात्मक विचार करताना दिसत नाहीत. पूर्वी मंजूर असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केलेली कामेही का सुरू केली? असा उलटा प्रश्न विचारणारे ग्रामस्थ असतात. काही वेळा अधिकाऱ्यांनी एखाद पूर्वीच मंजूर असलेले काम जरी त्यांच्या पातळीवर सुरू करण्यात आले, तरीही त्याला विरोध करणारे काही राजकीय पक्षांचे कार्यकर्ते असतात. असे कार्यकर्ते फक्त राजकारण करायचं म्हणून प्रयत्न करतात; परंतु त्याचा विकासकामांवर किती आणि कसा परिणाम होऊ शकतो याचा विचारही होत नसतो. या सर्वांमध्ये आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन होत असताना त्याचा विकास प्रक्रियेवर कोणताही परिणाम होणार नाही, याची काळजी घेतली जावी.**

# शेतात ऊसाचे पाचट, पाला पाचोळा जाळण्याचे प्रकार थांबवा

**उन्हाळ्यात** मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आगी लागतात,उन्हाळ्यातील उष्णतेने शॉर्ट सर्किट किंवा वायरिंग तापल्यानेही आगी लागतात , रस्त्यावर चालणारी चार चाकी किंवा इतर वाहनही अचानक पेट घेतात, तसेच या उन्हाळ्याच्या दिवसात शेतकरी दादा शेतातील ऊस पाचट व ईतर पाला पाचोळा ही मोठया प्रमाणात पेटवून देतात, अशा लागलेल्या आगीना नियंत्रणात ठेवणे खूप अवघड असते. तशात तीव्र व भीषण पाणी टंचाई चे दिवस आहेत.

थेंब, थेंब पाणी मिळणे कठीण झालेले असतांना आग विझवणे खूप अवघड आहे, याचे विपरीत परिणाम होऊन आणखी मोठया आगी लागू शकतात, राज्यातील शेतकरी दादांना नम्र विनंती आहे की, त्यांनी शेतातील ऊसाचे पाचट, पाला -पाचोळा, कपाशीच्या वाळलेली रोपटी न जळता ती जमिन खोदून त्यात पुरून टाका,त्याचे खत ही होईल व अतिप्रसंग ही उदभवणार नाहीत, जर अनवधानाने काही आगी लागल्या तर त्यावर पाणी न टाकता माती टाकून त्या विझवाव्यात,राज्यात भीषण पाणी टंचाई लक्षात घेता आगीचे हे प्रकार थांबवावेत असे वाटते.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# भैय्यांच्या युपीची घोडदौड आणि महाराष्ट्राची अधोगती- जबाबदार कोण?

**एका** कार्यक्रमात उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी त्यांच्या कार्यकाळात राज्यात झालेल्या औद्योगिक, आर्थिक विकासाचा आढावा लोकांसमोर मांडला. याचा युट्युब व्हिडीओ CM Yogi Speaks On Mandir Leher. 2024 Mandate & More या नावाने उपलब्ध आहे. हा व्हिडीओ बघताना योगी समर्थक आणि विरोधक दोघांनीही आपल्या डोक्यातून 'योगी, भाजपा, हिंदुत्व, मोदी सरकार, मराठी विरूद्ध भैय्ये' हे विषय बाजूला 'ठेवले तर तो व्हिडीओ आणि त्यातली आकडेवारी आपल्याला व्यवस्थित कळेल.

काही ठिकाणी मला युपीचं दरडोई उत्पन्न आणि त्याची पाकिस्तानी दरडोई उत्पन्नाशी केलेली तुलना वाचायला मिळाली आणि नंतर हा व्हिडीओ समोर आला. ती तुलना अर्थातच एका डाव्या- पुरोगामी- डापु गँगच्या महाभागाने केलेली होती. एका अर्थी हे दोन्ही एकामागोमाग एक झाल्याचा फायदा झाला आणि योगी काय बोलत होते ते अधिक डोळसपणे बघता आलं.

**योगी कोण आहेत?**

योगी मुख्यमंत्री होण्यापूर्वी गोरखपूर लोकसभेचे कित्येक वेळा खासदार होते, वयाच्या २६ व्या वर्षी ते पहिल्यांदा खासदार झाले. शैक्षणिक दृष्ट्या हेमवती नंदन बहुगुणा गढवाल विश्वविद्यालयातून त्यांनी गणितात बी.एससी. केलेलं आहे. त्यांची शैक्षणिक पात्रता सांगण्याची गरज एवढ्याच साठी भासली कि भगव्या कपड्यातला माणसाला देशाच्या सर्वात मोठ्या राज्याचा मुख्यमंत्री करणायामागचं औचित्य काय हा प्रश्न अनेक डापु सातत्याने विचारत आलेले आहेत. मागच्या ७ वर्षांच्या त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी दाखवलेली चमक आणि आर्थिक, औद्योगिक, पायाभूत सुविधांच्या पातळीवर केलेलं काम यातून त्यांची बौद्धिक, शैक्षणिक आणि राजकीय पात्रता सिद्ध करून दाखवलेली आहे. २०१७ ला ते मुख्यमंत्री झाले तेव्हा इंडियन एक्सप्रेसने त्यांच्या लोकसभा सदस्य म्हणून केलेल्या कामगिरीची आकडेवारी छापली होती त्यात त्यांचे निष्कर्ष होते ते असे कि योगीने प्रत्येक कार्यकाळात सर्वाधिक प्रश्न विचारणाऱ्या खासदारांच्या यादीत सतत आपलं स्थान अबाधित राखलेलं आहे आणि त्यांनी लोकसभेत विचारलेल्या प्रश्नात ९% प्रश्न (फक्त!) हे हिंदुत्वाशी संबंधित होते बाकी सर्व प्रश्न मतदारसंघाच्या किंवा राज्याच्या आर्थिक, सामाजिक, औद्योगिक समस्यांशी संबंधित होते! आता वळू त्यांच्या टाईम्स नाऊच्या भाषणातील आकडेवारीकडे!

त्यांच्या संपूर्ण भाषणात एकही भावनिक, धार्मिक मुद्दा नाही. नर्मदेच्या वरच्या प्रदेशांना सतत 'गाय पट्टा' म्हणून हिणवणाऱ्या डापुंनी हे भाषण जरूर ऐकावं. त्यांनी सांगितल्या प्रमाणे उत्तर प्रदेशात आज सर्वाधिक ४ आंतरराष्ट्रीय विमानतळ आहेत आणि सर्वाधिक ९ नागरी विमानतळ सुद्धा आहेत, या वर्षाअखेर राज्यात एकूण २१ विमानतळ कार्यरत होतील! देशातील सर्वात मोठें एक्सप्रेसवे जाळं (देशाच्या ४०% एकाच राज्यात), गंगा एक्सप्रेसवे डिसेंबर २०२४ ला सुरु होईल त्यांनतर देशाच्या एकूण एक्सप्रेसवे नेटवर्कच्या ५५% एक्सप्रेसवे एका यूपीत असतील! शिवाय देशातील सर्वात मोठे रेल्वे नेटवर्क त्याच राज्यात आहे. देशातील पहिलं हाय स्पीड रेल्वे नेटवर्क आणि सर्वाधिक लांबीचं मेट्रो नेटवर्क तिथेच आहे. खाद्यान्न, ऊस आणि दूध उत्पादनात देशात पहिल्या क्रमांकावर आहे. देशात सर्वाधिक ३५ कोटी पर्यटक उत्तर प्रदेशात होते आणि त्यातले ७ कोटी फक्त काशीच्या बाबा विश्वनाथ मंदिरात गेले!

देशातला सगळ्यात मोठा डिफेन्स कॉरिडॉर तिथेच सुरु झाला आहे आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे गुंडागर्दी आणि लुटपाटी विरोधात योगींनी उठवलेली कठोर पावले. या सगळ्याचा परिणाम म्हणून आज उत्तर प्रदेश खर्चापेक्षा जास्त कर जमा करतो, उत्तर प्रदेश 'टॅक्स सरप्लस स्टेट' आहे! आता बघू महाराष्ट्राकडे..

**महाराष्ट्राची आर्थिक, औद्योगिक सद्यस्थिती...**

आज कागदावर महाराष्ट्र जीएसटी कलेक्शनमध्ये देशात वरच्या स्थानावर आहे. याचं सगळ्यात महत्वाचं कारण म्हणजे मुंबईत असलेली तमाम कॉर्पोरेट संस्थानांची मुख्यालये, यामुळे कारभार कुठेही होवो टॅक्स मुंबईत जमा झालेला दिसतो! राज्यात वास्तविक औद्योगिक वातावरण कमालीचं निराशाजनक आहे. यच्चयावत सगळ्या औद्योगिक वसाहती स्थानिक राजकीय पक्षांचे नेते, गुंड टोळ्या आणि माथाडी नेत्यांच्या गुंडागर्दीमुळे त्रस्त आहेत. मंत्रालयात बोलावून मोठ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना कॉन्ट्रॅक्ट साठी किंवा भागीदारी देण्यासाठी धमकावल्याचे प्रकार कित्येक वेळा उजेडात आलेले आहेत. विदेशी कंपन्यांच्या विदेशी अधिकाऱ्यांना ॲट्रॉसिटी कायद्याखाली अटक करण्याचा प्रयत्न झाल्याच्या केसेस आहेत. स्थानीय सण, वार उत्सव, राजकीय कार्यक्रम, निवडणुका यासाठी वर्षातून वीस पंचवीस वेळा प्रत्येक कंपनीकडून पैसे काढणे सर्रास बाब आहे. आधी कॉन्ट्रॅक्ट वर कामाला जाऊन मग त्यांना कामावर कायम करा म्हणून संप आणि मग कंपनी बंद करण्यासाठी आंदोलन, हिंसाचार याबाबी नित्याच्याच आहेत.

हे बाहेरून आलेले उद्योग आम्हाला लुबाडतात, आमच्याच जीवावर पैसे कमावतात त्यामुळे आम्ही मागितले कि त्यांनी पैसे दिलेच पाहिजेत हा हि वेगळाच माज इथे आहे! उद्योगांना पावलोपावली त्रास द्यायचा आणि ते गेले कि गुजरातने मराठी उद्योग पळवले हि बोंब मारायची हा हि इथे आवडीचा कार्यक्रम आहे. एका मराठी उद्योजकाची शेकडो कोटींची उलाढाल असलेली औषध उत्पादन करणारी कंपनी इथून गुजरातला गेली, का माहित आहे? त्या कंपनीने आपली कंपनी वाढवण्यासाठी औद्योगिक वसाहतीतील रिकामा प्लॉट मागितला तेव्हा ते प्रपोजल कित्येक महिने मंजूर नं करता तसंच ठेऊन मग पाठपुरावा केल्यावर एका वजनदार नेत्याने मालकाकडे मोठीच्या मोठी भागीदारी मागितली! शेवटी हताश होऊन तो गुजरातला गेला!

राज्याच्या ग्रामीण, शहरी सर्व भागात आज श्रमाची कामे करणारे गवंडी, मेस्त्री, पोल्ट्री वाले, मांस, मासे, फळे, कपडे, भंगार खरेदी विक्री करणारे लोक, बांधकाम व्यवसायातील मजूर, कोकणात आंबा, काजू, मासेमारी यात काम करणारे बहुतांश मजूर झारखंड, नेपाळ, बंगाल, ओरिसा, आसाम इथून आलेले आहेत. समस्त मराठी युवा कुणाच्या तरी खर्चाने, कुणाच्या तरी स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या क्रिकेट, कबड्डी स्पर्धा भरवण्यात दंग आहे. गावोगाव उभी राहिलेली शिक्षण सम्राटांची कॉलेजेस हजारोंच्या संख्येने पदवीधर निर्माण करून समाजात सोडत (ओतत म्हणू शकतो!) आहेत पण त्यांनी पुढे काय करायचं याबाबत अंधार आहे.

असं म्हणतात कि जवळपास अख्खा मराठवाडा इंजिनियर होऊन पुण्यात येतो किंवा राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करण्यात कित्येक वर्ष खर्च करतो, त्यातले मोजके पास होतात बाकी निराश होऊन चाचपडत राहतात! कोकणात लोकसंख्या झपाट्याने घटत आहे आणि दरवर्षी कित्येक खेडी ओस पडत आहेत. गावोगावचे लोक आसपासच्या शहरात चाललेत आणि तिथून मोठ्या शहरांकडे! आज झारखंडी, नेपाळी मजूर नाही असं खेडेगाव कोकणात मिळणार नाही अशी अवस्था आहे!

राज्यातले उद्योग एका बाजूने स्थानिक मजुरांचा किंवा श्रम न करण्याच्या स्थानिकांच्या मानसिकतेच्या अभावामुळे आणि दुसऱ्या बाजूने संघटित टोळ्यांच्या लुटपाटीमुळे हैराण आहेत. येणाऱ्या काळात त्यांना अजून एका भीषण संकटाचा सामना करायचा आहे, ते संकट म्हणजे उत्तर प्रदेशाची घोडदौड! योगींच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशाची अर्थव्यवस्था फोफावत गेली कि तिथले उद्योग स्थानिक लोकांना सामावून घेऊन वर झारखंड, बंगाल, ओरिसा आणि नेपाळ इथून आपल्याकडे येणारे मजूर शोषून घेतील. स्वाभाविकपणे इथल्या उद्योगांना नव्या मजुरांचा शोध घ्यावा लागेल. कुणाला वाटत असेल हि भीती निराधार आहे तर त्याने आसपास जरा कानोसा घ्यावा, एवढ्यातच आपल्याकडे येणाऱ्या मजुरांच्या प्रादेशिक प्रोफाईल्स वेगाने बदलत जात आहेत आणि इथून उत्पिडनामुळे आणि मजूर समस्येमुळे बाहेर जाणाऱ्या उद्योगांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे!

गाय पट्ट्याची नवीन वास्तविकता आणि डापुंचा बौद्धिक अहंकार आणि आंधळेपणा..

डावे, पुरोगामी काँग्रेसच्या सत्तेला बौद्धिक आणि सैद्धांतिक आधार देत आले आहेत. त्याबाबत दोघात उत्तम ताळमेळ आणि सामंजस्य आहे. काँग्रेसने राजकारण करायचं आणि सत्ता आली कि डाव्यांची योग्य जागी वर्णी लावायची अशी हि व्यवस्था आहे!

यामुळेच डापू टोळ्या सध्या पूर्वीच केलेल्या चुका परत परत करत आहेत. डापुंचा अहंकार इतक्या टोकाचा आहे कि भाजप शासित राज्यात कि मोदी सरकारने कोणतीही लोकोपयोगी गोष्ट करून त्यातून सामान्य जनतेत लाभार्थी निर्माण झाले तरीही डापु त्याबाबत बोलणाऱ्या लोकांना 'अंध भक्त', 'व्हाट्सएप्प युनिव्हर्सिटी' वगैरे वगैरे दूषणे लावून गप्प करायला बघतात. परिणामस्वरूप काँग्रेस सुद्धा भाजपच्या, मोदी सरकारच्या किंवा आता योगी सरकारच्या कामांचा जनतेवर काही सकारात्मक परिणाम होतो आहे हेच मानायला तयार नाही!

डापुंच्या आंधळ्या हिंदुत्व द्वेषामुळे आणि त्यातून आलेल्या अहंकारी मोदी, शाह, योगी द्वेषामुळे भाजप सलग २ वेळा केंद्रात सत्तेत आलं आणि आता तिसऱ्यांदाही येईल अशी खात्री दिसते आहे. एखादी गोष्ट जनतेच्या गळ्यात उतरवायची असेल तर मध्यम मार्गी अपप्रचार करावा हे भानही डापुंना नाही त्यामुळे २०१४ ते २०२४ याकाळात देशात एकही सकारात्मक, विकासात्मक, लोकोपयोगी काम झालं नाही या ओळीवर ते प्रचार करतात आणि मग मोदीच्या योजनांमुळे निर्माण झालेले लाभार्थी चिडून मोदीला मतदान करतात! डापुंनी आपला स्ट्राईक रेट वाढवण्यासाठी शेखर गुप्ताची शिकवणी लावावी, गुप्ता आधी मोदी सरकारच्या लोकोपयोगी कामांची मुक्तकंने स्तुती करतो आणि मग हळूच आपला मुद्दा; ज्यात सुप्तपणे मोदी विरोध पॅकबंद केलेला असतो तो श्रोत्यांच्या नरड्यात कोंबतो! यामुळे मोदी, भाजपा समर्थक गुप्तांचे व्हिडीओ बेमालूमपणे (मूर्खपणाने) पसरवत सुटतात!

सध्या डापुंच्या भाषेत बोलायचं तर 'गाय पट्टा' अतिशय वेगाने नव्या आर्थिक क्रांतीच्या दिशेने दौडत आहे, तेवढ्याच वेगाने खुद्द मराठी माणूस, स्वार्थी बिनडोक मराठी राजकारणी आपल्या राज्यात उद्योग कसे येतात तेच बघतो आणि आलेच तर ते कसे टिकतील तेच बघतो असा दृढनिश्चय करून बसले आहेत. पुणे जिल्ह्यात उद्योगांना त्रास देणाऱ्या लोकांवर 'मकोका' लावा असे तथाकथित आदेश काढून ४ वर्ष झाली तरी पिळवणूक, गुंडगिरी तशीच सुरु आहे, औद्योगिक पट्ट्यात या लुटपाटीचा वाटा आपल्याही हाती लागावा म्हणून वर्दीधारी अधिकाऱ्यांची 'अर्थपूर्ण लॉबिंग' पूर्वीसारखीच सुरु आहे. नवीन येऊ पाहणाऱ्या उद्योगाला कृत्रिम अडवणूक निर्माण करून भागीदारी मागण्याचे प्रकार आधी सारखेच सुरु आहेत आणि या सगळ्याला भाजप द्वेषाच्या बुरख्या आड लपवून गप्प राहण्याचे डापुंचे सत्याचे प्रयोगही आधीप्रमाणेच सुरु आहेत!

**ढोंगी डापू!**

सर्व प्रश्नाची उत्तरे डापुंच्या खिशात आहेत- यूपीत विकास होतोय कि नाही सांगा म्हटल्यावर डापुंचं उत्तर असतं 'तिथे होणाऱ्या बुलडोझर जस्टीस बद्दल बोला', यूपीत गुंडागर्दी थांबून सामान्य जनता शांततेत जगते कि नाही विचारलं कि यांचं उत्तर असतं 'खोट्या एन्काउंटर बद्दल आधी बोला', मोदीने लोकांच्या खात्यात थेट पैसे टाकले कि नाही म्हटलं कि डापु म्हणणार 'प्रत्येकाला १५ लाख देणार होते त्याचं काय झालं?', मोदीने जागोजाग रस्ते बांधले, जनधन खाती काढली म्हटल्यावर डापू म्हणणार 'एजन्सीचा गैरवापर होतोय, लोकशाही धोक्यात आलीये!'

थोडक्यात काय काँग्रेसचे वैचारिक दूत अर्थात डापु राजकीय दृष्ट्या बऱ्यापैकी निष्क्रिय समाजाला डिवचून, चिडवून २०२४ च्या लोकसभेत मोदीला मतदान करायला भाग पाडणार यात शंका नाही! आता असे विरोधक असतील तर बिचारा मोदी काय करणार? मनात असो नसो नाईलाजाने होईल बापडा पंतप्रधान होणार सलग तिसऱ्यांदा! आणि रागाच्या मनात असो नसो तो थायलंडच्या टूर करत राहणार!

**-विनय जोशी**

# 'स्ट्रगल फॉर लाईफ'

Conquest of Happiness (१९३०) हे बर्ट्रांड रसेलचं एक छान पुस्तक आहे. ह्यात पहिल्या नऊ प्रकरणांत रसेल माणसं दुखी का होतात ह्याची व उरलेल्या आठ प्रकरणांत आनंद कसा मिळवू शकतील ह्याची चर्चा करतो. दैनंदिन जीवनातील दुःखाची कारणमीमांसा करताना 'स्पर्धा' ह्या एका महत्वाच्या कारणाची तो विस्ताराने चर्चा करतो. 'स्ट्रगल फॉर लाईफ' असं गोंडस नाव देऊन आपण खरंतर छोट्या व चिल्लर म्हणाव्या अशा अडचणींच उदात्तीकरण करत असतो. जेंव्हा आपण 'स्ट्रगल फॉर लाईफ' असं म्हणतो, तेंव्हा बहुतेक वेळा आपल्याला 'अधिकाधिक यश मिळवण्याची धडपड' अपेक्षित असते. म्हणजे सकाळी उठून 'भाकरी मिळेल कि नाही' ही नाही, तर 'माझ्या शेजाऱ्याहून मी आधिक यशस्वी, आधिक श्रीमंत, आधिक प्रतिष्ठित होईल कि नाही' हि खरी धडपड असते.

ह्या धडपडीची तुलना तो ट्रेडमिलवर धावण्याशी करतो, म्हणजे त्या पट्टूयावर राहायचं तर तुम्हाला थांबता येत नाही. मग आपल्याला कुठल्याही निश्चित ठिकाणी पोहोचवू शकत नाही अशा दैनंदिन धावण्याचा काय फायदा? हे स्पष्ट असलं तरी बहुतेकांना ह्या धावपट्ट्यावरून बाजूला होणं म्हणजे युद्धात शत्रूसमोर माघार घेण्यासारखं कमीपणाचं वाटत असं रसेल म्हणतो. आपली बायको, मुलबाळं ह्यांच्याशी संवाद साधायलाही आजकाल माणसांना वेळ नसतो. 'बिझी असणं' हा आपल्या काळाचा मोठा आजारचं म्हणावा लागेल. अशा प्रकारे धावणाऱ्या माणसाला यश मिळेलही पण यश हे आनंदी जीवनाचा केवळ एक भाग आहे आणि इतर सर्व गोष्टींना दुर्लक्षून जर ते आपण मिळवणार असू तर तो मोठाच घाट्याचा सौदा ठरेल असं तो सांगतो.

रसेल म्हणतो की अशा १०० मीटरच्या वेगवान शर्यतीत आयुष्य घालवणाऱ्या माणसांच एकमेव 'डेस्टिनेशन' म्हणजे त्यांची कबर किंवा समाधी. आता शेवटी आपण सगळ्यांचं गंतव्य हेच असलं तरी अकाली उद्भवणारा हृदयविकार, ताण असह्य झाल्याने होणारे मृत्यू हयांच वाढते प्रमाण आपण पाहतो तेंव्हा रसेलचं म्हणणं पटतं. शंभर मीटरच्या शर्यतीसाठीची तीव्र एकतानता जर मनुष्याच्या जगण्याची पद्धतच बनली तर अति होऊन त्याचा शेवट शारीरिक-मानसिक ब्रेकडाउन मध्ये होणं अटळ आहे, असं रसेल बजावतो.

अशा माणसांची तुलना तो सती प्रथेमध्ये बळी जाणाऱ्या स्त्रियांशी करतो. बाहेरून बघणार्याला असं वाटेल कि लोक त्या स्त्रीला चितेमध्ये ढकलताहेत पण बहुतेक वेळा ह्या स्त्रिया स्वतःहून आगीत उडी मारत. स्वतःच्या खऱ्या आयुष्यापेक्षा, स्वतःच्या जिवापेक्षा, खोटी काल्पनिक प्रतिष्ठा, सन्मान हे महत्वाचे आहेत असं त्यांच्या मनात समाजाने घट्ट ठसवलेलं असे. तीच गत आजच्या माणसांची आहे. पैसा, यश व त्यामुळे लाभणारी प्रतिष्ठा हा जणू आधुनिक माणसाचा धर्म झालाय आणि त्याच्या रक्षणासाठी तो स्वखुशीने एकदाच मिळणाऱ्या अनमोल आयुष्याचा बळी द्यायला तयार आहे. यश, पैसा ह्या गोष्टी आनंदी होण्यासाठी माणसाला आवश्यक आहेतच पण पैसे कशासाठी हयाच उत्तर रसेल माणसाला निवांतपणा, सुरक्षितता मिळावी हे देतो. असा मोकळा निवांत वेळ माणसांच्या चेतना ताज्या करतो, त्यांना पुनर्जीवन देतो. जगण्याचा समरसून आनंद घेण्यासाठी हे आवश्यक असतं. पण आजकाल लोक पैसे मिळवतात ते ह्या दोन्हींसाठी नाही तर अजून अधिक पैसे मिळवण्यासाठी!

एकदा पैसा मिळाला कि अजून अधिक पैसा मिळवण सोपं होत जातं. गरिबी अनुभवलेले किंवा जवळून पाहिलेले लोक तर आपल्या किंवा मुलांच्या नशिबी दारिद्र्य कधीही येऊ नये म्हणून संपत्तीच्या सरंक्षक भिंती बांधणं हा त्यांच्या आयुष्याचा एककलमी कार्यक्रम मानतात. शेवटी प्रश्न पडतो तो या पैशाचं, मिळवलेल्या यशाचं करायचं काय? मग बऱ्याचदा आम्ही बघा आयुष्य कसं मस्त एन्जॉय करतोय हे जगाला दाखवणं त्यांना निकडीचे वाटायला लागतं. पर्यटनस्थळी गेल्यावर तिथे निवांत श्वास घेण्याआधी फोटोसेशन करून तात्काळ समाजमाध्यमांवर शेअर करणं त्यांना आवश्यक वाटतं. 'एन्जॉयजिंग ॲट लेह लडाख विथ माय स्वीटहार्ट किंवा विथ माय हबी' असं म्हणताना असा प्रश्न पडतो कि तू जर तिथं एन्जॉय करतोयस किंवा करते आहेस तर मग इथे फेसबुकवर कोण एकामागून एक फोटो, व्हिडीओ टाकतय ?

खरं तर बदलणारे ऋतू, त्यामुळे निसर्गात निर्माण होणारे विविध रंग, वास, चांगलं साहित्य, संगीत हे त्यांच्या गावीही नसत. आर्ट गॅलरीतील महागडी चित्र किंवा शिल्पं ह्यांच्या दिवाणखान्यात असतात ती ह्यांना ती खूप आवडलेली असतात म्हणून नाही तर ती इतर कुणाकडेच नसून फक्त माझ्याचकडे आहेत ह्या भावनेतून मिळणाऱ्या समाधानासाठी!

मग माणसाने काय करावं? रसेलचं थेट उत्तर आहेः त्याचा धर्म बदलावा, यश व पैसा हे आयुष्याचं एकमेव प्रयोजन आहे असं मानलेला माणूस आनंदाजवळ, सुखाजवळ फिरकूही शकत नाही असं तो बजावतो. माणसाने स्वीकारलेला 'स्पर्धेचा धर्म' सहज सोडणं सोपं नाही, हयाच कारण यश व पैसा ह्याला समाजाने दिलेली मान्यता व अवाजवी महत्व . इथे रसेल यूरोप व अमेरिकेत ह्याविषयी असणारा फरक सांगतो, यूरोपात (व अनेक पूर्वेकडील राष्ट्रांतही) बुद्धी, कला ह्यांना (यश व पैसा मिळो न मिळो) महत्व होतं, प्रतिष्ठा होती, राजेशाहीत राजाश्रय होता. स्वातंत्र्य लढ्यातील वा सुधारक चळवळीतील लोक असतील, युद्धात पराक्रम गाजवलेले लोक असतील, कलाकार असतील, साहित्यीक असतील; ते श्रीमंत असोत

कि नसोत त्यांना सामाजिक प्रतिष्ठा होती. बऱ्याचदा त्यांचं धनाढ्य नसणं हाही एक गुणंच मानला जायचा (इथं रसेल आणि भारतीय विचारांत एक महत्वाचा फरक मला जाणवला तो म्हणजे दारिद्र्याचं उदात्तीकरण तो आजिबात करत नाही). यशाच्या मागे पळायचं सोडलं तर माणसांना आपली खरी पॅशन काय हे कळण्याची शक्यता वाढते, मग यश-पैसा हे तुमच्या कामाचे सहज निर्माण होणारे बायप्रॉडक्ट्स ठरतात- 'न मागे तयाची रमा होय दासी' म्हणतात तसं.

आज मात्र डॉक्टर असो, शास्त्रज्ञ असो वकील असो कि राजकारणी असो ह्या सगळ्यांचं मोठेपण ओळखण्याची एकमेव कसोटी समाज वापरतो अन ती म्हणजे त्या माणसांनं जमा केलेला पैसा, येनकेन प्रकारे मिळवलेली प्रसिद्धी. ह्या सर्व लोकांची व्यावसायिक क्षमता सर्वसामान्यांना सहज कळणं सोपं नाही, मग त्यांच्या 'लॅव्हिश लाइफस्टाइल' कडे पाहून लोक ती ठरवतात. फॉर्च्युनरनि आला म्हणजे राजकीय वजन खूप असणार, मर्सिडीज मधून, थ्रीपीस मध्ये उतरला म्हणजे हुशार डॉक्टर किंवा वकील असणार किंवा कोटींमध्ये बजेट असलं कि चित्रपट चांगला असणारच असे चुकीचे हिशोब आम्ही सर्रास करतो. ह्याचा परिणाम उलटही होताना दिसतो. म्हणजे त्या डॉक्टर, वकील, राजकारण्यांनाही मग असं मनापासून वाटायला लागत कि मी अमुक कार वापरली नाही, तमुक वेशभूषा केली नाही तर लोक आपल्याला सिरिअसली घेतील कि नाही! 'जेवढा पैसा अधिक, तेवढा माणूस हुशार

..... पान ३ वर

# वस्तीगृहाच्या चिमुकल्या मुलींनी-मुलींनीही ही केला राज्य पुरस्कारार्थी चा सत्कार



वैजापूर, दि. २१ (प्रतिनिधी) - येथील मदर टेरेसा मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहातील मुली व संत रोहिदास मागास वर्गीय मुलांच्या वस्तीगृहातील छोट्या मुलां-मुलींनी राज्य शासकीय पुरस्कार प्राप्त धोंडीरामसिंह राजपूत व डॉ. संतोष गंगवाल यांचा बुधवार(ता.२०) रोजी त्यांच्या वस्ती गृहात स्नेहपूर्वक बुके शाल अर्पण करून अभिनंदन केले.

राजपूत व डॉ. गंगवाल याना अनुक्रमे पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल या दोघांचाही सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. याच कार्यक्रमात मराठा सेवा संघ चे जिल्हा कार्याध्यक्ष मोती वाघ, वि.पा. कॉलेजचे ग्रंथपाल डी.आर. निकम यांनी सत्कार करून अभिनंदन केले. या प्रसंगी अध्यक्षस्थानी सेवा निवृत्त प्राध्यापक ज्ञानेश्वर जाधव होते. तर प्रमुख उपस्थितीत सामाजिक कार्यकर्ते साहेबराव पडवळ, नाभिक महामंडळ शाखा वैजापूरचे अध्यक्ष दिलीप अनर्थे, से.नि. शिक्षक अशोक मांजरे, सौ. शैला गंगवाल, गायके यांची उपस्थिती होती.

आरंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्र संचलन वस्तीगृह प्रमुख अण्णासाहेब ठेंगडे यांनी केले व मुलींच्या वसतिगृह प्रमुख सौ. ठेंगडे यांनी आभार मानले.

# धोंडीरामसिंह राजपूत यांचा पुरस्कार मिळाल्याप्रित्यर्थ साईभक्तांनी केला सत्कार व अभिनंदन



वैजापूर, दि. २१ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३६जिल्ह्यातून एकमेव समाज कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय एकमेव पुरस्कार पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड प्रदान केला. त्यांना हा पुरस्कार राज्याचे मुख्यमंत्री ना,एकनाथराव शिंदे,उपमुख्यमंत्री ना,अजित दादा पवार, समाज कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी मुंबई येथे नुकताच एका भव्यदिव्य कार्यक्रमात प्रदान केला. तर दुसरा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार ही त्याना प्रदान करून राजपूत यांच्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक,स्वच्छता विषयक, कृषी व माझी वसुंधरा विषयक, पाणी अडवा -पाणी जिरवा, मेरी माटी मेरा देश अशा सर्वसमावेशक कार्याची दखल घेत राजपूत यांना दोन राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित केले.

येथील श्री साई बहूउद्धेशिय सेवा भावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास शेठ साखरे, साई उत्सव समितीचे अध्यक्ष विशाल शेठ संचेती, कार्याध्यक्ष राजू लालसरे, महेंद्र काटकर, प्रशांत गायकवाड, अण्णा अधिकार, दिनेश राजपूत, काशिनाथ शेठ भावसार, गणेश अनर्थे,गोविंद दाभाडे, शैलेश पोंदे, राम उचित, केशव आंबेकर, कचरू राजपूत, गौरव दौडे, मनोज दौडे, सुधीर लालसरे व सर्व साई भक्तांनी राजपूत यांचा भव्य सत्कार करून अभिनंदन केले.

# जैन टॅगचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि. २१ (प्रतिनिधी) - नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रम राबविणा-या जैन टॅगच्या पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न झाला. यामध्ये नुतन अध्यक्षा रिचा कासलीवाल, उपाध्यक्षा श्श्वेता कासलीवाल, सचिव पुजा झांजरी व कोषाध्यक्षा पुर्वा कासलीवाल यांनी पदभार स्विकारला. महिला दिवसाचे औचित्य साधुन नविन कार्यकारणी मंडळीला प्रसिध्द कुक सौ.पुनम बिद्रा यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व महिलांना नवनविन प्रकारचे सॅडविच कसे बनविले जाते. या बददल मोफत मार्गदर्शन केले. तसेच नुतन कार्यकरणी ही शैक्षणिक साहित्य, अन्नदान, रक्तदान शिबीर आदी सामाजिक उपक्रम राबविणार असल्याचे हि सांगण्यात आले. या कार्यकमात जैन टॅगच्या फांऊडर अध्यक्षा अनुपमा दगडा, दिपीका बडजाते, दिपाली पांडे, जयश्री लोहाडे, श्श्वेता सेठी, श्श्वेता गंगवाल, छाया कासलीवाल, स्वाती कासलीवाल, नेत्रजा कासलीवाल, किर्ती पाटणी, मिताली काला, मोनिका चांदीवाल, रचना पहाडे, पुजा सेठी, सपना पाटणी, उज्वला पाटणी, याशिका पांडे, सिम्मी पहाडिया, सिमा बडजाते, सारिका बडजाते, रिना ठोले, आदींची यावेळी उपस्थिती होती अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# मराठवाडा भूकंपाने हादरला; १९९३ नंतरचे सर्वात मोठे धक्के

**मराठवाड्यात** १९९३ नंतर आज सकाळी भूकंपाचे सर्वात मोठे धक्के जाणवले. नांदेड, हिंगोली, परभणी जिल्ह्यात पाहटे भूकंपाचे धक्के बसले. हिंगोली जिल्ह्यात ४.५ रिश्टर स्केलची तर काही ठिकाणी ३.६ रिश्टर स्केल तीव्रतेची नोंद झाली आहे. जिल्ह्यांतील अनेक गावांमधील घरांना तडे गेले आहेत तर काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

हिंगोली जिल्ह्यात पहाटे ६ वाजून ८ मिनिटांनी भूकंपाचा मोठा धक्का बसला आहे. ४.५ रिश्?टर स्केलची नोंद झाली आहे. तर त्यानंतर काही



वेळातच झालेल्या दुसऱ्या धक्कयाची ३.६ एवढी नोंद झाली आहे. भूकंपामुळे झालेल्या नुकसानीची माहिती तातडीने प्रशासनाला देण्याच्या सुचना गावपातळीवरील कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

हिंगोली जिल्हयात मागील तीन ते चार वर्षापासून जमीन हादरण्याचे प्रकार वाढले आहेत. जमीनीतून आवाज येऊन जमीन हादरत असून वारंवार होणाऱ्या या घटना आता गावकऱ्यांच्याही अंगवळणी पडल्या आहेत. विशेषतः औंढा नागनाथ तालुक्यातील पिंपळदरी, राजदरी, सोनवाडी, काकडदाभा, फुलदाभा या गावांसह वसमत तालुक्यातील वापटी, कुपटी, पांगरा शिंदे, वाई तर कळमनुरी तालुक्यातील सिंदगी, बोल्डा, पोतरा, नांदापूर या भागात जमीन हादरण्याचे प्रकार नित्याचेच झाले आहेत. गुरुवारी पहाटे सहा वाजून आठ मिनीटांनी जमीन चांगलीच हादरली. भूकंपाचा मोठा आवाजही झाला. विशेष म्हणजे आजचा भूकंप जिल्हयातील सर्वच ७१० गावांमध्ये जाणवल्याचे सांगण्यात आले आहे. यामध्ये औंढा नागनाथ, वसमत, कळमनुरी तालुक्यात त्याची तिव्रता अधिक होती. तर हिंगोली व सेनगाव तालुक्यातील काही गावांत कमी अधिक तिव्रता जाणवली आहे. या घटनेमुळे गावकरी चांगलेच हादरून गेले आहेत. दांडेगाव येथे काही घरांची पडझड झाली आहे. आखाडा बाळापूर व परिसरात सकाळी सहा वाजून आठ मिनीटांनी मोठा धक्का जाणवला. तर त्यानंतर काही वेळातच सौम्य धक्के जाणवल्याचे गावकरी केशव मुळे यांनी सांगितले. पिंपळदरी परिसरात आता पर्यंतचा सर्वात मोठा धक्का बसल्याचे गावकरी बापूराव घोंगडे यांनी सांगितले.

# हिंगोलीतील रामेश्वर तांडा हे भूकंपाचे केंद्र

हिंगोली, दि. २१ (प्रतिनिधी) - २१ मार्च रोजी सकाळी ०६:०८:३० वाजता ४.५ रिश्टर स्केलचा भूकंप झाल्याची नोंद राष्ट्रीय भूकंप मापण यंत्रणेवर दिसून आली. हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात असलेल्या कुरुंदा व दांडेगावच्या उत्तर भागातील रामेश्वर तांड्याच्या उत्तर भागात भूकंपाचे केंद्र असल्याचे दिसून आले. याची खोली १० किलोमीटर असल्याचे दिसत आहे.

लगेचच दुसरा हलका धक्का पहिल्या धक्क्यानंतर अकरा मिनिटांनी म्हणजे सकाळी ०६:१९:०५ वाजता ३.६ रिश्टर स्केल चा भूकंप झाल्याची नोंद राष्ट्रीय भूकंप मापण यंत्रणेवर दिसुन आली. मात्र या भूकंपाचे केंद्र तिन किलोमीटर दक्षिणेला असलेल्या कुरुंदा व दांडेगावच्या रामेश्वर तांड्याच्या दक्षिण भागात असल्याचे दिसून आले. याही भूकंपाची खोली १० किलोमीटर असल्याचे दिसत आहे.

मराठवाड्यातील १९९३ च्या भूकंपानंतरचा हा सर्वात मोठा आहे. यावेळेस हिंगोली नांदेड परभणी जिल्ह्यातील अनेक ठिकाणी या भूकंपाचे धक्के बसल्याचे फोन आले.

श्रीनिवास औंधकर, संचालक, एमजीएम एपीजे अब्दुल कलाम खगोल अंतराळ विज्ञान केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी सांगितले.

# वैजापूरच्या श्री साईबाबा उत्सव समिती अध्यक्षपदी युवकांचे प्रेरणास्त्रोत विशाल शेठ संचेती यांची एकमताने निवड

वैजापूर, दि. २१ (प्रतिनिधी) - येथील श्री, साई बहुउद्धेशिय सेवा भावी संस्था च्या वतीने गेल्या१४वर्षांपासून सात दिवशीय साई सच्चरित्र पारायण,महापुराण कथा,काल्याचे कीर्तन, शिर्डी पायी पालखी ,व महाप्रसाद आयोजित करण्यात येतो. १५ते२०हजार भक्त भाविक या उत्सवात सहभागी होतात. याही वर्षी वैजापूरात'श्री, साईबाबा उत्सव पुढील महिन्यातील २९ एप्रिल २०२४पासून आरंभ होत आहे.






पूर्व तयारी म्हणून बुधवार(ता. २०)रोजी राजू लालसरे यांचे निवास 'व्हाइट -हाऊस' येथे शहरातील विविध मंडळे, साईभक्त यांची बैठक संस्थापक अध्यक्ष कैलास शेठ साखरे यांच्या उपस्थितीत बैठक होऊन या १५व्या वर्षाच्या साई उत्सवाची कार्यकारिणी पुढील प्रमाणे सर्वनुमते निवडण्यात आली. अध्यक्ष -विशाल शेठ जीवनशेठ संचेती, कार्याध्यक्ष - राजेंद्र लालसरे, उपाध्यक्ष-प्रशांत गायकवाड, मनोज दौडे,अण्णा अधिकार, गणेश अनर्थे. सचिव-श्रीनिवास सोनवणे, जगदीश आश्रमा, दर्शन गायकवाड, सहसचिव-भरत उचित,ऋतिक राजपूत, कचरू राजपूत, कोषाध्यक्ष-विनोद आहेर, केशव आंबेकर मंडळाचे मार्गदर्शक ठा.धोंडीरामसिंह राजपूत यांनी वरील कार्यकारिणी सर्व उपस्थितांनासमोर जाहीर केली व सर्वांनी टाळ्या वाजवून एकमताने संमती दिली. या प्रसंगी संस्थापक अध्यक्ष कैलास शेठ साखरे, दिनेश राजपूत, काशिनाथ भावसार, गोविंद दाभाडे, महेंद्र काटकर, राम उचित, उमेश पोटे, मनोज दौडे, उमेश राऊत यांनी नव्या कार्यकारिणी चे पुष्पहार टाकून स्वागत केले. या प्रसंगी उमेश राजपूत, सुधीर लालसरे, गौरव दौडे व शहरातील विविध गणेश मंडळ व इतर मंडळ सदस्य साई भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वर्षी शिवपुराण सात दिवशीय कथा समाधान महाराज शर्मा यांच्या अमृत वाणीतून वैजापूर कराना ऐकण्यास मिळणार आहे.

# मराठा आरक्षण विरोधी याचीका आयोगाच्या निरीक्षणाच्या नोंदी न तपासताच आहे - राजेंद्र दाते पाटील

मुंबई, दि. २१ (प्रतिनिधी) - मराठा आरक्षण विरोधी याचीका आयोगाच्या निरीक्षणाच्या नोंदी न तपासताच आहेत असे प्रतिपादन आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक आणि मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

सदरच्या याचीकेत प्रमुख आक्षेप हा ५०ऱ्ह मर्यादा हा विषय प्रामुख्याने पुढे आला असुन कायदेशीर प्रश्न हा आहे की, न्यायमुर्ती सुनील सुक्रेआयोगाचा अहवाल व शिफारशी न तपासताच बहुसंख्य अंदाजावर आधारीत याचीका असल्याचे स्पष्ट होत आहे. ज्या इंद्रा सहानी निकालाचा सातत्याने संदर्भ दिला जातो त्याचा तपशील तपासता यात बरेच काही दडलेले असुन यथा योग्य बचाव केला तर फायदा नक्कीच होणार असुन या निकालातील अनुक्रमांक ८१० असे म्हणतो कि,' मा. सर्वोच्च न्यायालयाने इंद्रा साहनी निकालाच्या पॅरेग्राफ क्रमांक ८१० मध्ये असे म्हटले आहे की ५०ऱ्ह नियमांचे उल्लंघन करण्यासाठी राज्याने अत्यंत सावधगिरी बाळगली पाहीजे. या निकालाचा संबंधित परिच्छेद येथे पुन्हा सादर केला आहे या माननीय न्यायालयाचा रेफरल साठी: ५० ऱ्ह हा नियम असला तरी, या देशाच्या आणि लोकांच्या महान विविधते मध्ये अंतर्भूत असलेल्या काही विलक्षण परिस्थितींचा विचार न करणे आवश्यक आहे. असे होऊ शकते की दूरच्या आणि दुर्गम भागात त्या भागात राहणारी लोकसंख्या कदाचित च्या मुख्य प्रवाहातून बाहेर असल्याच्या कारणास्तव राष्ट्रीय जीवन आणि त्यांच्यासाठी विलक्षण आणि वैशिष्ट्यपूर्ण परिस्थिती लक्षात घेता, वेगळ्या पद्धतीने उपचार करणे आवश्यक आहे, या कठोर नियमात काही शिथिलता अनिवार्य होऊ शकते. असे करताना,अत्यंत सावधगिरी बाळगली पाहिजे आणि एक विशेष बाब तयार केली पाहीजे.

अशा बाबी स्पष्ट पणे नमुद असुन त्याचा तपशील तपासता यात बरेच काही दडलेले असुन यथा योग्य बचाव केला तर या निकालातील अनेक अनुक्रमांकांचा फायदा घेणे शक्य असल्याचे प्रतिपादन आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक आणि मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचिका कर्ते राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

याचिकाकर्त्याने असे म्हटले आहे की प्रतिवादी क्रमांक एक आयोग/ शासन याने उल्लंघन करण्यासाठी कोणतीही असाधारण परिस्थिती प्रदान करण्यात अयशस्वी ठरला. मराठा समाजाला ५० टक्के आरक्षण देण्याचा नियम कसे केले हा प्रश्न आहे असे जवळ पास सर्वच याचिकेत असे नमुद आहे.परंतु राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवालानुसार काय नोंदी आहेतः हे अद्याप अहवाल गोपनीय असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अंदाजावर आधारीत मराठा आरक्षण विरोधातील याचीका टाकण्याचा हा निव्वळ सपाटा आहे असे म्हणता येईल असे स्पष्ट मत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक आणि मुंबई उच्च न्यायालयातील मुख्य

# रमजान म्हणजे व्यक्तीच्या गुण दोषाचा आत्मपरीक्षणाचा कालखंड होय!

**रमजानूल** मुबारक ईबादतचा (प्रार्थना) महिना समजला जातो, या महिन्यात मुस्लिम बंधू-भगिनी दिवसा रोजे (उपवास)धरतात व रात्री दररोजपेक्षा जास्त वेळ प्रार्थना करतात. इतर दिवसापेक्षा या महिन्यात जास्त प्रमाणात दानधर्म, आणि जकात अदा करतात, सर्वात चांगला रोजा म्हणजे जो व्यक्तीला वाईट कर्मापासून परावृत्त करतो, स्वतः च्या इच्छावर नियंत्रण ठेवण्यास भाग पाडतो, अल्लाहची भीती मनात निर्माण होऊन व्यक्ती मध्ये स्वतः स्वयंशिस्त निर्माण होते,हाच रोजा धरण्याचा मुख्य उद्धेश आहे.

इतर दिवसात कधीही आपल्या इच्छेनुसार चहा-पान-नाश्ता-जेवण करणारी व्यक्ती रमजानच्या महिन्यात रोजा धरून त्याच्या समोर या गोष्टी आणल्या तरी स्वतः वर एक बंधन टाकुन घेऊन निश्चित वेळ संपल्याशिवाय काहीही खात पित नाही, स्वतःला या खाण्या - पिण्याच्या मोहापासून अलिप्त ठेवते. कितीही कट्टर व्यसनधारी व्यक्ती रमजानच्या काळात कोणत्याही व्यसनाचे नाव घेत नाही. रमजानचा रोजा अशी एक शक्ती आहे की जी आपल्या सवयीना,व्यसनाना नियंत्रणात ठेवण्याची प्रेरणा देते, मानवी जीवनात अनेक चढ उतार असतात. इतर दिवशी सर्वच एक दुसऱ्यांची चेष्टा, निंदा, नालस्ती, चेष्टा, कुचेष्टा वर खमंग चर्चा करतात. मात्र रमजान महिन्यात अशा कोणत्याही विषयावर चर्चा नसते. फक्त आणि फक्त एक दुसऱ्यांचे शुभ चिंतन, विधायक विचार यालाच या महिन्यात शुभ मानले जाते. एक दुसऱ्याच्या उखळ्या-पाखळ्या काढून विनाकारण बदनामीचे धनी होण्यापेक्षा सर्व मुस्लिम बंधू-भगिनी रोजा धरून आत्मचिंतन करण्याला प्राधान्य देतात.

रमजानचा पूर्ण महिना प्रत्येकाला स्वतः तिल गुण दोषाचे आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो, या महिन्यात सर्वच व्यक्ती स्वतःतील दोष बाजुला सारतात. चांगले ते घेतात व वाईट ते सोडून देतात, प्रत्येकाला रमजान महिन्यात आपल्या गुण दोषाचे आत्मपरीक्षण करण्याची संधी मिळते.

आज मानवी वृत्ती, प्रवृत्ती कमालीची बदललेली आहे, विधायक विचारांची जागा विघातक वृत्ती घेऊ पाहत आहे, काम, क्रोध, मोह, माया, मत्सर, अहंकार हे मानवी जीवनाचा सत्यानाश करणारे व्यसन आज मानवाला गिळत आहेत, शुभ ऐवजी अशुभ चिंतन वाढलेले आहे. या सर्व बाबीवर आत्मपरीक्षण रमजानच्या या पवित्र व मंगलमय महिन्यात या भूतलावरील प्रत्येक व्यक्तीने करावे व रमजान महिन्याला साक्षी ठेऊन चांगले ते घ्यावे, शुभ ते चिंतावे, अशुभ चिंतन टाळावे, सर्वांचे मंगल चिंतावे, अमंगल ते त्यागावे तरच या भूतलावर शांती, बंधुभाव, प्रेम, सहानुभूती, सदभाव, सदवर्तन, सदविचार वाढतील व सर्वत्र आनंदी -आनंद नांदेल.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# 'स्ट्रगल फॉर लाईफ'

**पान २ वरून**

अन पैसे न मिळवू शकणारा मूर्ख' असं समीकरण सर्वमान्य असत, मग अशा समाजात मूर्ख म्हणवून घेणं कुणाला आवडेल?

समाजाच्या ह्या मानसिकतेचं मूळ तपासताना रसेल म्हणतो कि मध्ययुगीन कट्टर धर्मवाद्यांनी मानवी इच्छांना गौण ठरवून सुखाचा संकोच केला व ह्याला उतारा म्हणून कि काय नवनैतिकतावाद्यानी मानवी इच्छा हीच केंद्रस्थानी मानली. मानवी संवेदना, बुद्धी ह्यांना गौण मानल, मग स्पर्धा हा अशा युगाचा स्थायीभाव बनल्यास नवल नाही. पण अशा स्पर्धेतून तयार होणाऱ्या यशस्वी लोकांची तुलना रसेल डायनासोरांशी करतो व हे बजावतो की डायनासोर शेवटी जिंकले नाहीत तर नष्ट झाले. एके काळी पृथ्वीवर राज्य केलेले हे जीव शेवटी एकमेकांना संपवून नष्ट झाले. आधुनिक मानवही ह्या डायनासोरच्या पावलावर पाऊल ठेवून चालतोय. शेवटी रसेल इशारा देतो तो महत्वाचा आहेः ज्यांच्या जीवनात काडीचाही आनंद उरलेला नाही अशी प्रजात बुडण्याच्याच मार्गावरच आहे. स्पर्धेवर बेतलेली समाजव्यवस्था फार तर दोन-तीन पिढ्या टिकेल. त्यानंतर मात्र अंत टाळण्यासाठी त्यांना हे मानेवरचा ओझं फेकूनच द्यावं लागेलं. नाहीतर ह्यातून सुटका म्हणून लोक दारू, ड्रग्ज, हिंसा असे मार्ग शोधतील, इतरांना संपवतील व शेवटी स्वतः संपतील. नव्वद वर्षांपूर्वीच हे लिखाण असेल आजच आपल्याशीच बोलत आहे इतकं कालसुसंगत वाटत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो.:९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# वाहन व्यवस्थेची सज्जता ठेवा- उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- निवडणूक पूर्वतयारीचा भाग म्हणून जिल्ह्यातील शासकीय वाहन व्यवस्थेतील वाहने अधिग्रहित करुन आवश्यकतेनुसार वाहन व्यवस्थेची सज्जता करावी,असे निर्देश उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी आज वाहतुक व्यवस्थेचा आढावा घेतांना दिले.

लोकसभा निवडणूकीसाठी जिल्हा प्रशासनाला लागणाऱ्या वाहनांचा आढावा आज घेण्यात आला. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, वाहतुक व्यवस्थेचे नोडल अधिकारी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी मनीष दौंड, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे डॉ. आर. के. श्रीवास्तव, डॉ. एस. ए. सोनवणे, सहा. मोटार वाहन निरिक्षक संदीप शेलार, अमित लखपती तसेच सर्व निरीक्षक उपस्थित होते.

वाहतुक व्यवस्था कक्षाचा आढावा यावेळी घेण्यात आला. निवडणूक कामकाजासाठी वेगवेगळ्या टप्प्यावर लागणाऱ्या वाहनांची आवश्यकता तपासून त्यानुसार वाहने उपलब्ध करणे. त्यासाठी आवश्यक ती वाहने अधिग्रहित करणे, विधानसभा मतदारसंघनिहाय वाहनांचे वितरण करणे, सर्व अधिग्रहित वाहनांची स्थिती तपासणे, आवश्यकतेनुसार भाडेतत्त्वावर पुरवठादाराकडून वाहने उपलब्ध करणे, जिल्ह्याचा वाहतुक आराखडा तयार करणे, मतदान यंत्रे व निवडणूक साहित्य वाहतुकीसाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरक्षित व जीपीएस यंत्रणेसहित वाहने सज्ज ठेवणे इ. बाबतीत आढावा घेण्यात आला.

निवडणूक कालावधीत जिल्ह्यात ५५८ जीप, ३६३ बस गाड्या, ३६ मिनी बस, २७९ क्रुजर वा तत्सम वाहने, ३४ कंटेनर अशी तब्बल १२७० वाहने लागणार आहेत. त्यादृष्टिने आधी शासकीय वाहने अधिग्रहित करणे, त्यात सध्याच निवडणूक कामात वापरात असलेली व सध्या वापरात नसलेली अशी वाहने यांची माहिती एकत्रित करुन वापरात नसलेली वाहने अधिग्रहीत करण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी व वाहन व्यवस्था सज्ज ठेवावी. प्रत्यक्ष निवडणूकीच्या वेळी वाहनांची आवश्यकता वाढते. त्यादृष्टीने नियोजन करावे,असेही निर्देश देण्यात आले.

# छत्रपती संभाजीनगरच्या सेव्हन हिल्स उड्डाणपुलावर अपघात; खड्डा चुकवण्याच्या नादात तरुणीची दुभाजकाला धडक

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगरातील सेव्हन हिल्स उड्डाणपुलावर आज एका दुचाकीस्वार तरुणीचा अपघात झाला. यात गाडीचा चक्काचूर झाली आहे. पण सुदैवाने तरुणीला गंभीर दुखापत झाली नाही. अपघातातनंतर जवळच्या एमजीएम रुग्णालयात तिच्यावर उपचार करण्यात येत आहे.

दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार २८ वर्षीय तरुणीला उजव्या खांद्याला आणि डोक्याला थोडी दुखापत झाली आहे. काही काळ दुचाकीस्वार तरुणी उड्डाणपुलावरून खाली पडल्याची अफवा पसरल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सुदैवाने तिला गंभीर दुखापत झाली नाही. खड्डा वाचविण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाल्याची माहिती आहे.

सिडको बसस्थानकाहून आकाशवाणीच्या दिशेने जात असताना उड्डाण पुलाच्या सुरुवातीला दुभाजकाच्यामधून मुख्य रस्त्यावर येण्याच्या प्रयत्नात दुचाकीस्वार कारवर धडकला. कारने त्याला काही अंतरापर्यंत फरफटत नेले. यात एपी २५ एन ११७७ ॲक्टिव्हाचा चुराडा झाला. जखमीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती.

कंपनीतील काम आटोपून मोटारसायकलवरून घरी परत जाण्यासाठी निघालेल्या २६ वर्षीय युवकास सेव्हन हिल उड्डाणपुलावर विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारने डिव्हायडर फोडून धडक दिल्यामुळे तो जागेवरच गतप्राण झाला. अभिनव ढगे असे मृताचे नाव असून, तो चिकलठाण्यातील रिअलटीम सिस्टिम कॉल सेंटरमध्ये नोकरीस होता.

भडकल गेटकडून कर्करोग रुग्णालयाकडे भरधाव वेगात दुचाकीवरून (एमएच २०जीएन ५९१८) जात असताना टाउन हॉल उड्डाणपुलावर दुचाकी रस्त्याच्या कठड्याला धडकली. या भीषण अपघातात दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला होता.

### लोकसभा निवडणूक २०२४

# शनिवारी 'वाचन लेखन' दिवस- जिल्हाधिकारी स्वामी



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- नोडल अधिकारी, सहाय्यक नोडल अधिकारी, त्यांच्या अधिनस्त सर्व कर्मचारी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तसेच तालुकास्तरावरील निवडणूक कर्मचारी यांनी शनिवार दि.२३ रोजी हा पूर्ण दिवस निवडणूक विषयक कामकाजाची कार्यपद्धत, नियम इ. विषयीचे वाचन करावे व आवश्यक ती टिपणे काढून लेखन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

जिल्हा नोडल अधिकाऱ्यांची आज बैठक पार पडली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, मनपा अति. आयुक्त रणजीत पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर तसेच सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी उपस्थित सर्व नोडल अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, सगळ्यांनी आपल्यास्तरावरुन आपल्या विषयाशी संबंधित तालुकास्तरीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घ्यावे. आपापल्या विषयाशी संबंधित निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांची व नियमांची तसेच कार्यपद्धतीची सखोल माहिती होणे आवश्यक आहे. त्यासाठी शनिवारी दि.२३ रोजी सगळ्यांनी आपापल्या कार्यालयात अथवा सुयोग्य अशा जागी जाऊन कर्मचारी अधिकाऱ्यांनी आपल्या विषयाशी संबंधित नियम पुस्तिकांचा अभ्यास करावा. त्याची टिपणे काढावीत. सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व नोडल अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त कर्मचारी अधिकारी यांनी वाचन व लेखन केल्याची खातरजमा करावी असेही जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्देश दिले. त्यांनी तसे पत्रही दिले आहे.

# 'मम्मी-पप्पा मतदान करा', १४ हजार शालेय विद्यार्थ्यांचे पत्र



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- 'कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नका, संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन मतदान करा आणि आपली लोकशाही मजबूत करा', हे शब्द म्हणजे मतदानाचे महत्त्व सांगणारे असले तरी या शब्दांना एक आगळे वेगळे महत्त्व आहे. कारण हे शब्द शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या मम्मी-पप्पांना उद्देशून लिहिले आहेत.

मतदार जनजागृतीचा भाग म्हणून औरंगाबाद मध्य (१०७) या विधानसभा मतदार संघात हा प्रयोग राबविण्यात आला. छत्रपती संभाजीनगर शहराचा मोठा भाग यात समाविष्ट होतो. जवळपास १२६ शाळांमधील इयत्ता ५ वी ते ९ वी च्या शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या आई बाबांना म्हणजेच मम्मी पप्पांना भावनिक पत्र लिहून मतदान करण्याचे आवाहन केले आहे. १२० खाजगी तर ६ मनपा शाळांमधील विद्यार्थी यात सहभागी झाले. तब्बल १४ हजार विद्यार्थ्यांनी शाळेत ही पत्रे लिहिली. आणि आपल्या मम्मी पप्पांना नेऊन दिली.

उपविभागीय अधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व्यंकट राठोड यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. तहसिलदार शिवानंद बिडवे यांनी हा उउपक्रम राबविण्यासाठी परिश्रम घेतले. सर्व शाळा व त्यांच्या मुख्याध्यापकांनी यात सहयोग दिला. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे त्यांच्या घरी पत्र नेऊन दिल्यावर आई बाबांनी मोठ्या कौतुकाने स्वागत केले. आपलीच लेकरं आपल्याला आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव करुन देतायेत म्हटल्यावर आई बाबांच्या चेहऱ्यावर लेकराचं कौतूक ओसांडून वाहतांना दिसत होते.

# दोघांनी उमेदवारी मागितली म्हणजे वाद नव्हे; माझा अन् खैरेंचा वाद मीडियापुरता, उमेदवारी जाहीर होईपर्यंत मी इच्छुक-अंबादास दानवे



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीवरून छत्रपती संभाजीनगरमधील शिवसेना ठाकरे गटातील दोन नेते विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आणि ठाकरे गटाचे वरिष्ठ नेते चंद्रकांत खैरे यांच्यात वाद पाहायला मिळतो. पण या वादावर अंबादास दानवे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. मी दहावर्षांपासून लोकसभा तिकीटासाठी पक्षाकडे आग्रही आहे. पक्षात दोन ते तीन लोकांनी तिकीट मागितले म्हणजे वाद झाला असे म्हणता येणार नाही. त्यामुळे खैरे अन् माझ्यातील वाद हा मीडिया चालवतात, जो पर्यंत उमेदवारी जाहीर होत नाही तो पर्यंत मी तिकीटासाठी इच्छुक आहे. ज्या दिवशी उमेदवार ठरला तेव्हापासून प्रचारात उतरणार, असा दावाही अंबादास दानवे यांनी केला.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचं जागावाटप कधी होणार याची सर्वत्र चर्चा होतेय. त्यावरही दानवेंनी प्रतिक्रिया दिलीय. दानवे म्हणाले की, फॉर्म्युला ठरला आहे. लवकरच घोषणा होईल. महाविकास आघाडी उध्दव ठाकरे यांच्याशी लढत देण्यासाठी किती प्रयत्न करावे लागता.महासत्ता म्हणता मग आमच्या विरुद्ध लढायला एक एक माणूस जमा करावं लागत आहे. तुमच्या विरोधात जनमत आहे. आणखी किती माणसं घ्यायची ती घ्या, असं अंबादास दानवे म्हणाले.

महिला सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरे यांची भेट न झाल्याने काल नाराजी व्यक्त केली होती. त्यावर अंबादास दानवे म्हणाले की, काही लोकांनी भेटायला वेळ १० ची दिली होती. ९ वाजता येऊन भेटा म्हटलं, असं होत नाही. पक्षप्रमुख पुढे आग्रह करणे योग्य नाही. ११. ३० वाजता ते सगळ्यांना भेटणार होते, आता नेते आहेत. त्यांच्या वेळा बघितलं पाहिजे. आमच्या घरातल्या भगिनी आहेत. चहाला बोलावलं तर सगळी नाराजी दूर होईल, असेही अंबादास दानवे म्हणाले.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि भाजप यांच्यातील युतीवर अंबादास दानवे म्हणाले की, राज ठाकरेंमुळे महायुतीला काहीही बळ मिळणार नाही. उलट तुम्ही त्यांना घ्या. आमचा फायदा होईल. राज ठाकरे यांना सोबत घेतल्यावर काय बोलणार? कोणत्या तोंडाने लाव रे तो व्हिडिओ म्हणावे.

संभाजीनगर लोकसभा मतदार संघात कोणीही उमेदवार असो. कराड, सावे किंवा शिंदे गटाचा असो आम्ही तयार आहोत. पक्ष प्रमुखांना माहिती आहे. संभाजीनगरात कोण कोण तयार आहे, कोण इच्छुक आहे. त्यामुळे पक्षप्रमुख ठरवतील त्याला उमेदवारी जाहिर होईल. उमेदवार जाहिर होईपर्यंत मी अद्याप इच्छुक आहे, असे दानवे म्हणाले. ज्या दिवशी उमेदवार जाहिर झाला त्याला निवडून आणण्यासाठी मी कामाला लागेल, असेही दानवे यांनी स्पष्ट केले.

# 'फिरते व स्थायी' पथक प्रमुखांना निवडणूक कालावधीत विशेष अधिकार

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक कालावधीत निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात स्थायी व फिरते पथकांची नियुक्ती जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी दिलीप स्वामी यांच्या आदेशान्वये करण्यात आली आहे. ही पथके जिल्ह्यातील १०४- सिल्लोड, १०५- कन्नड, १०६- फुलंब्री, १०७- औरंगाबाद मध्य, १०८- औरंगाबाद पश्चिम, १०९- औरंगाबाद पूर्व, ११० –पैठण, १११- गंगापूर, ११२- वैजापूर या विधानसभा मतदारसंघ निहाय स्थापित करण्यात आली आहेत. या पथकाच्या प्रमुखांना निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासून म्हणजेच दि.१६ मार्च पासून ते दि.६ जून २०२४ पर्यंतच्या कालावधीसाठी विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १२९, १३३, १४३ व १४४ अन्वये विशेष अधिकार प्रदान करण्यात आले असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी दिलीप स्वामी यांनी प्रदान केले आहेत. जिल्ह्यात तब्बल २२६ पथके नियुक्त असून त्या पथकांचे प्रमुखांना हे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, असे आदेशात नमूद आहे.

(पान १ वरुन)

## इलेक्टोरल बाँड प्रकरणी एसबीआयने निवडणूक आयोगाला...

क्रमांक वगळता निवडणूक रोख्यांबाबत इतर कोणतीही माहिती नाही.

सीजेआय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने सांगितले की, माहिती उघड करताना निवडक असू शकत नाही. यासाठी आमच्या आदेशाची वाट पाहू नका. एसबीआयची इच्छा आहे की आम्ही त्यांना काय खुलासा करायचा आहे ते सांगावे, मग ते सांगतील. ही वृत्ती योग्य नाही.

यापूर्वी, ११ मार्चच्या निर्णयात खंडपीठाने ला बाँडची संपूर्ण माहिती देण्याचे निर्देश दिले होते. तथापि, एसबीआयने केवळ ज्यांनी रोखे खरेदी केले आणि रोखले त्यांची माहिती दिली. कोणत्या राजकीय पक्षाला कोणत्या देणगीदाराने किती देणगी दिली, याचा खुलासा करण्यात आलेला नाही. यानंतर न्यायालयाने १६ मार्च रोजी स्टेट बँक ऑफ इंडियाला नोटीस दिली आणि १८ मार्चपर्यंत उत्तर मागितले.

सुप्रीम कोर्टाने गेल्या वर्षी २ नोव्हेंबर रोजी इलेक्टोरल बाँड्सच्या कायदेशीरतेवर आपला निर्णय राखून ठेवला होता, तरीही २०२४ मध्ये ८,३५० बाँड छापण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक बाँडची किंमत एक कोटी रुपये आहे. माजी नौदल अधिकारी आणि पारदर्शकता कार्यकर्ते लोकेश बत्रा यांच्या आरटीआय प्रश्नाला उत्तर देताना एसबीआयने ही माहिती दिली.

## पराभव दिसत असल्यामुळे भाजपची केविलवाणी...

यांनी एका पोस्टच्या माध्यमातून भाजपवर निशाणा साधला. ते म्हणाले की,काँग्रेस पक्षाला निवडणूक लढता येऊ नये यासाठी आयकर विभागाला हाताशी धरून काँग्रेस पक्षाच्या बँक अकाउंटशी संबंधित ३० वर्षे जुनी म्हणजे १९९४-९५ पासून आता पर्यंतची सर्व फाईली उघडून केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी इन्कम टॅक्स विभागाला कामी लावले आहे. २०२४ ची लोकसभा निवडणूक जवळ येताच इन्कम टॅक्स विभागाने आधी काँग्रेसी पक्षाची बँक खाती गोठवली. आणि आता ही उचापत! १० वर्षांपासून भाजप सत्तेत आहे, नरेंद्र मोदी स्वतः १० वर्षांपासून पंतप्रधान आहे मग १० वर्षात हा तपास का करण्यात आला नाही ? दुसऱ्यांचे पक्ष फोडून, बाँडच्या माध्यमातून ९००० कोटीच घबाड जमा करून ही निवडणुकीत स्वतःचा पराभव जवळ दिसत असल्यामुळे ही केविलवाणी धडपड भाजपची सुरू आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या कडक भूमिकेनंतर 'पतंजली'ची बिनशर्त माफी

व मेडिकल क्षेत्रातून होणाऱ्या अपप्रचारापासून वाचवा'', अशा मथळ्याखाली पतंजली आयुर्वेदने १० जुलै २०२२ रोजी 'द हिंदू' या वृत्तपत्रात अर्ध्या पानावर औषधांबाबत जाहिरात दिली होती. तसेच करोना साथीच्या वेळी बाबा रामदेव यांनी ॲलोपॅथीबाबत केलेल्या वादग्रस्त विधानांचा देखील उल्लेख रिट याचिकेत करण्यात आला होता.

# आत्मनिर्भर व्यवसायिक प्रशिक्षण व महिला सक्षमीकरण केंद्राचे उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- अरविंद फाउंडेशनच्या अंतर्गत तिसरे आत्मनिर्भर व्यवसायिक प्रशिक्षण व महिला सक्षमीकरण केंद्र त्रिमूर्ती चौक याचे उद्घाटन जी श्रीकांत आयुक्त तथा प्रशासक महानगरपालिका व सीईओ स्मार्ट सिटी छत्रपती संभाजीनगर ह्यांचा हस्ते करण्यात आले.

यावेळेस मनपा उपायुक्त सविता सोनवणे अर्पिता शरद, मीडिया विश्लेषक स्मार्ट सिटी छत्रपती संभाजीनगर, पूजा डेडे लाईटहाऊस कम्युनिटी सेंटर उपस्थित होत्या. आत्मनिर्भर केंद्र मध्ये महिलांसाठी ब्युटी पार्लर, फॅशन डिझाइनिंग ,योगा क्लासेस, मॉन्टेसरी ,आरी वर्क, मेहंदी रंगोली आर्टिस्ट, असे अनेक कोर्स घेतल्या जाणार आहे. आयुक्त महोदय यांनी नवीन कोर्स बेबीसिटर (बालसंगोपन दाई) हे सुरु करण्यास नोकरी करणाऱ्या पालकांची प्राथमिक गरज व आधुनिक व्यवसायिक प्रशिकणाचा भाग म्हणून त्याला बघण्यात यावं असे मार्गदर्शन केले, अरविंद फौंडेशनच्या संचालिका नेहा धाडवे (ढोके) यांनी महिलांच्या व्यवसायिक रुद्धी साठी नवनविन प्रशिक्षणे देण्यात येतील.

# महावितरणच्या नाट्य स्पर्धेचे आज उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर दि.२१ (प्रतिनिधी)- महावितरणच्या प्रादेशिक स्तरावरील आंतरपरिमंडलीय नाट्य स्पर्धा २२ व २३ मार्च २०२४ रोजी तापडिया नाट्यमंदिरात होणार आहे. या स्पर्धेत महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयांतर्गत तिन्ही परिमंडलांतर्फे नाटकांचे सादरीकरण होणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी (२२ मार्च) सायंकाळी ७ वाजता महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता हे राहतील. याप्रसंगी लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे व नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता अनिल डोये हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या स्पर्धेत शुक्रवारी (२२ मार्च) सायंकाळी ७.३० वाजता छत्रपती संभाजीनगर परिमंडलातर्फे डॉ.गणेश शिंदे लिखित व श्रावण कोळनूरकर दिग्दर्शित 'उत्तरदायित्व' हा नाट्यप्रयोग सादर करण्यात येईल. शनिवारी (२३ मार्च) सकाळी ९ वाजता रत्नाकर मतकरी लिखित व प्रमोद देशमुख दिग्दर्शित 'ब्लाइंड गेम' हा नाट्यप्रयोग नांदेड परिमंडलातर्फे सादर करण्यात येईल, तर दुपारी १ वाजता मोहन राकेश लिखित, विश्वनाथ राजपाठक अनुवादित व धनंजय पवार दिग्दर्शित ? 'आषाढातील एक दिवस' हा नाट्यप्रयोग लातूर परिमंडलातर्फे सादर करण्यात येईल.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण शनिवारी (२३ मार्च) दुपारी ४ वाजता छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता व छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या हस्ते होणार आहे. नाट्यरसिकांनी मोठ्या संख्येने या प्रयोगांना उपस्थित राहून महावितरणच्या कलावंतांना प्रोत्साहित करण्याचे आवाहन स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव तथा छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी केले आहे.